# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

१० जानेवारी, २०१८



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


### ❖ पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहीमेतंर्गत अवैध दारुविक्रीच्या जिल्हयात एकुण १७ केसेस :-

महाराष्ट्र शासनाचे आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०१५ पासुन दारुबंदी घोषीत करण्यात आलेली असुन पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन **दिनांक ०९/०१/२०१८ चे ००:०१ ते २३:५९ वाजता पर्यंत जिल्ह्यात पोलीस रामनगर, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, ब्रम्हपुरी, नागभिड, सावली, राजुरा, विरूर, गडचांदुर** हद्दीत **एकुण ७,७६,९५०/-रू.** ची अवैध दारु जप्त करण्यात आली आहे. पोलीस स्टेशनला एकुण **१७** गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असुन **१०** आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

---

### ❖ रोडवर धोकादायक स्थितीत वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन धारकांवर कार्यवाही :-

**पोलीस स्टेशन रामनगर:-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **रामनगर** अंतर्गत ०१ आरोपी इसमाने आपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **रामनगर** येथे अप.क्र. ३२/२०१८ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **रामनगर** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी:-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **ब्रम्हपुरी** अंतर्गत ०२ आरोपी इसम हे आपआपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **ब्रम्हपुरी** येथे अप.क्र. २२/२०१८ व २३/२०१८ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ०२ आरोपींना अटक करण्यात आले असुन पुढील तपास **ब्रम्हपुरी** पोलीस करीत आहे.

---

### ❖ मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या मद्यपी वाहन चालकांवर कार्यवाही :-

**पोलीस स्टेशन भद्रावती :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **भद्रावती** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे धोकादायकपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **भद्रावती** येथे अप.क्र. २८/२०१८ कलम २७९ भादंवि सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहेत. सदर गुन्ह्यातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **भद्रावती** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन शेंगाव :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **शेंगाव** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे धोकादायकपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **शेंगाव** येथे अप.क्र. १०/२०१८ कलम १८४, १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहेत. सदर गुन्ह्यातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **शेंगाव** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन चिमुर :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **चिमुर** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे धोकादायकपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **चिमुर** येथे अप.क्र. १८/२०१८ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहेत. सदर गुन्ह्यातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **चिमुर** पोलीस करीत आहे.

---

❖ **पोलीस स्टेशन मुल हदद्दीत संशयास्पदरित्या फिरणाऱ्या आरोपीतांना अटक:-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी **रामनगर** पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा राजोली येथे २१:१५ आणि २२:०० वाजता दरम्यान ०२ आरोपी इसम हा आपले अस्तित्व लपवुन कोणतातरी हस्तपेक्षीय गुन्हा करण्याचे उददेशाने फिरत असता मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **रामनगर** येथे अप. क्र. २३/२०१८ व २४/२०१८ कलम १२२ मुंबई पोलीस कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **रामनगर** पोलीस करीत आहे.

---

❖ **मुंबई जुगार कायदा अन्वये कार्यवाही :-**

**पोलीस स्टेशन गडचांदुर :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **गडचांदुर** अंतर्गत लखमापुर येथे ०४ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गडचांदुर** येथे अप.क्र. १५/२०१७ कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील **०४** आरोपींना अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,०९०**/-रू. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **गडचांदुर** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन शेंगाव :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **शेंगाव** अंतर्गत खानगांव येथे ०४ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **शेंगाव** येथे अप.क्र. ११/२०१७ कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील **०४** आरोपींना अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **९७०**/-रू. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **शेंगाव** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन पाथरी :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **पाथरी** अंतर्गत करगाव येथे ०१ आरोपी ईसम हे सटट्‌ापटट्‌ी आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो. स्टे. **पाथरी** येथे अप.क्र. १०/२०१७ कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील **०१** आरोपींना अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **४५०**/-रू. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **पाथरी** पोलीस करीत आहे.

---

❖ **प्रतिबंधक कारवाई :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी जिल्ह्यात कलम १०७ दंड प्रक्रिया संहिता अन्वये **०१**, कलम ११० दंड प्रक्रिया संहिता अन्वये **०२, कलम** १२२ मुंबई पोलीस कायदा अन्वये **०२, कलम** ११०/११७ मुंबई पोलीस कायदा अन्वये **०२, कलम ९३ दारूबंदी कायदा अन्वये ०१** असे एकुण **०८** ईसमांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

---

❖ **मोटार वाहन कायदा अन्वये कारवाई :-**

दिनांक ०९/०१/२०१८ रोजी जिल्ह्यात अवैध प्रवाशी ०३, रिफलेक्टर/नोपार्किंग ०१, दारू प्राशन १८५ अन्वये **०३** व इतर केसेस **३३३** असे एकुण **३४०** केसेस करण्यात आल्या आहेत.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# घरफोडी करणाऱ्या अट्टल चोरांना राजुरा पोलीसांनी केले जेरबंद

दिनांक २१/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन राजुरा येथे फिर्यादी नामे अविनाश तळवेकर यानी तक्रार दिली की, त्यांचे राहते घरी गोवरी कॉलोनी, सास्ती, राजुरा येथील डब्लुसीएल क्वार्टर मध्ये घरात कोणीही नसतांना कोणीतरी अज्ञात इसमांनी घरफोडी करून माल चोरीस नेला आहे. अशा तक्रारीवरून पोलीस स्टेशन राजुरा येथे अप.क्र. ११२६/२०१७ कलम ४५७, ३८० भादंवि अनव्ये गुन्हा नोंद करून तपास सुरु झाला.

तपासादरम्यान राजुरा येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली कि, घरफोडी करणारे काही संशयीत इसम हे बल्लारशाह परिसरात फिरत आहे. अशी माहिती मिळताच पोलीसांनी तात्काळ एका इसमास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता सदर आरोपीने आपल्या साथीदारासह घरफोडी केल्याची कबुली दिली. सदर आरोपीने राजुरा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या घरफोडीच्या एकुण ०६ गुन्हयाची कबुली दिली. या सहाही गुन्हयात रोख रकमेसह रोख रक्कम व साहीत्यासह मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीचा ०६ दिवसाचा पोलीस कोठडी रिमांड मिळाला असुन सदर आरोपीतांकडुन आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर गुन्हाचा तपास मा. पोलीस अधीक्षक श्रीमती नियति ठाकर आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. हेमराजसिंह राजपुत यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. शेखर देशमुख यांचे नेतृत्वात पोनि श्री. ओ. जी. कोकाटे यांचे सह पोउपनि मुटेकर, नापोशि राजीक, पोशि संदीप यांनी अथक परिश्रम घेतले.

---

चंद्रपूर पोलीस

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# अल्पवयीन मुलीस पळवुन नेवुन अत्याचार करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

दिनांक २१/०४/२०१५ रोजी पोलीस स्टेशन दुर्गापुर अंतर्गत मौजा चिचोली येथे फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीस फुस लावुन पळवुन नेवुन अत्याचार करणा-या आरोपीस ०९/०१/२०१८ रोजी **श्री. के. एल. व्यास, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांनी** कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

यातील आरोपी नामे प्रशांत दौलत कोरवते वय २० वर्ष रा. चिचोली ता. जि. चंद्रपुर हा आणि फिर्यादीची अल्पवयीन मुलगी यांचे एकमेकांशी ओळख असुन दिंनाक २१/०४/२०१५ रोजी आरोपीने फिर्यादीच्या मुलीस फुस लावुन पळवुन नेवुन तिचेवर अत्याचार केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप.क्र. ३३/२०१५ कलम ३६३, ३७६ (२)(आय)(एन) भादंवि सहकलम ५, ६ बा.लै.अ.सं. कायदा अनव्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरिक्षक संगीता कदम पोलीस स्टेशन दुर्गापुर यांनी पुर्ण करून आरोपींविरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०९/०१/२०१८ रोजी **आरोपी नामे प्रशांत दौलत कोरवते वय २० वर्ष रा. चिचोली ता. जि. चंद्रपुर** यास कलम ३७६ (१) भादंवि व पोक्सो मध्ये ०७ वर्षाची शिक्षा व ३,०००/-रू दंड, न भरल्यास ०३ महिने शिक्षा व दंडाची रक्कम पिडीताला देण्यात यावी अशी शिक्षा **श्री. के. एल. व्यास, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, चंद्रपूर** यांनी ठोठावलेली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. देवेंद्र महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा करतारसिंग सुखराम मडावी पोलीस स्टेशन दुर्गापुर यांनी काम पाहिले.

---

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
चंद्रपूर पोलीस